# प्रेसनोट दि. १३/१२/२०१०

## स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीणची कामगिरी

**मालाविषयी १२ गुन्हे उघडकीस :– २ जबरी चोरी, ४ घरफोडया व ६ चो–या, ३ तोळे सोने, ५ मोटार सायकलीसह १,७६,०००/– रू चा माल जप्त व अट्टल २ गुन्हेगार अटकेत**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. भास्कर थोरात व त्यांचे पथकास गोपनीयरित्या बातमी मिळाली की, पाटकुल व चिंचोली एम.आय.डी.सी. ता. मोहोळ येथील रेकॉर्ड वरील गुन्हेगार मागील १ वर्षापासुन मोहोळ, सोलापूर तालुका व अकलुज पोलीस ठाणे हद्दित वेगवेगळया प्रकारचे मालाविषयी गुन्हे केले असून गुन्हयात चोरून आणलेले मोटार सायकल वापरत असल्याची माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मौजे पाटकुल ता. मोहोळ येथे जावून लखन उर्फ पप्पू सुरेश काळे रा. पाटकुल व लखन शामराव काळे रा. चिंचोली एम.आय.डी.सी. ता. मोहोळ या दोघांना २ मोटार सायकलीसह पकडून त्यांचेकडे अधिक चौकशी करता त्यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

१) दिनांक ०६/०७/२०१० रोजी वर नमूद चोरटयांनी आपले इतर साथिदारासह अरिहंत कंपनी काटी चिंचोली एम.आय.डी.सी. येथे फिर्यादी मोहन शंकर पानसकर यांचे राहते घरात घूसून तलवारीचा धाक दाखवून २७,५००/– रू किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने व मोबाईल हे जबरीने चोरून नेले होते. सदर बाबत मोहोळ पोस्टे गु.र.नं. २८२/१० भादविक ३९२ प्रमाणे गुन्हा दाखल असून गुन्हयातील चोरीस गेले मालापैकी सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आलेला आहे.

२) दिनांक ०४/०८/२०१० रोजी चिंचोली एम.आय.डी.सी. मोहोळ मधील वृषभ पाईप कंपनी येथे तलवारीचा धाक दाखवून एक मो.सा. व ५ जुन्या इले. मोटारी असा एकुण २१,५००/– रू किंमतीचा माल जबरीने चोरून नेल्याने अमोल नारायणराव फेसाडे यांनी फिर्याद दिल्याने मोहोळ पोस्टे गु.र.नं. ३२६/१० भादविक ३९२ प्रमाणे दाखल असून सदर गुन्हयातील प्लॅटीना मोटार सायकल व जुन्या इले. मोटार मधील तांब्याची तारा जप्त करण्यात आले आहे.

३) मोहोळ पोस्टे गु.र.नं. २७१/१० भादविक ३९५ मधील चोरटयांनी दि.२६/०६/१० रोजी नागार्जुन कंपनीचे गोडाऊनचे वॉचमनचे हात पाय बांधुन ऑफीस मध्ये कोंडून ८,८४,४६२/– रू. चा माल दरोडा टाकून चोरून नेले होते. सदर गुन्हयात यापुर्वी मुंबई येथील चोरीचा माल घेणा–या गुन्हेगारांना अटक करण्यात आले होते. सदरचा गुन्हा लखन शामराव काळे व लखन सुरेश काळे या दोघांनी आपले इतर साथीदारासोबत केल्याचे कबुल केले आहे.

४) सोलापूर तालुका पो.स्टे. गु.र.नं. ९३/१० भादविक ४५७,३८० मधील अज्ञात चोरटयांनी दि.१५/०४/१० रोजी कोंडी येथे घरफोडी चोरी करून सुमारे ६९,०००/– रू. किमतीचे सोन्याचे दागिने व मोबाईल चोरून नेल्याचे कबुल करून ठिकाण दाखविले आहे.

५) सोलापूर तालुका पो.स्टे. गु.र.नं. १३५/१० भादविक ४६१,३८० मधील अज्ञात चोरटयांनी दि.१५/०६/१० रोजी कोंडी येथील पायोनिअर ट्रान्सफोर्ट कंपनीचे गोडाऊनचे कुलपे तोडून सुमारे ६९,०००/— रू. किमतीचे मोटारी, केबल वायर चोरून नेले होते. सदर गुन्हयातील गेले मालापैकी २ लक्ष्मी कंपनीचे मोटार व कॉपर वायर जप्त करण्यात आलेले आहे.

६) मोहोळ पो.स्टे. गु.र.नं. २१३/१० भादविक ३७९ मधील अज्ञात चोरटयांनी लांबोटी येथुन एम.एस.ई.बी. विज पारेषन कंपनी येथुन सुमारे १,२०,०००/— रू. किमतीचे कॉपर पाईप चोरी केल्याचे कबूल करून ठिकाण दाखविले आहे.

७) मोहोळ पो.स्टे. गु.र.नं. ३०३/१० भादविक ३८० मधील अज्ञात चोरटयांनी दि.१३/०७/१० रोजी सुजल फुड कंपनी मधुन ५७,०००/— रू. किमतीचे बॅट—या, पाईप व केबल वायर चोरी केल्याचे कबुल करून ठिकाण दाखविले असून केबल वायर जप्त करण्यात आलेले आहे.

८) मोहोळ पो.स्टे. गु.र.नं. ८३/१० भादविक ३७९ मधील अज्ञात चोरटयांनी सावळेश्वर शिवारातून इले. मोटार चोरी केल्याचे कबूल केले असून मोटार मधील तांब्याची तारा जप्त करण्यात आले आहे.

९) सोलापूर तालुका पो.स्टे. गु.र.नं. २३/१० भादविक ३७९ मधील अज्ञात चोरटयांनी बिबिदारफळ शिवारातून इले. मोटार चोरी केल्याचे कबूल केले असून मोटार मधील तांब्याची तारा जप्त करण्यात आले आहे.

१०) अकलुज पो.स्टे. गु.र.नं. १५४/१० भादविक ३७९ मधील अज्ञात चोरटयांनी अकलुज स्टॅन्ड परीसरातुन चोरून आणलेली हिरो होंडा मोटार सायकल जप्त करण्यात आलेली आहे.

११) मोहोळ पो.स्टे. गु.र.नं. ०९/१० भादविक ३७९ मधील अज्ञात चोरटयांनी चिंचोली एम.आय. डी.सी. परीसरातुन चोरून आणलेली के ४ कायनेटीक मोटार सायकल जप्त करण्यात आलेली आहे.

१२) मोहोळ पो.स्टे. गु.र.नं. ३५७/१० भादविक ४५७,३८० मधील अज्ञात चोरटयांनी मोहोळ येथे घरफोडी करून २,१६,५००/— रू.रोख रक्कम चोरी केल्याचे कबुल केले आहे.

नमुद आरोपीतांकडून वरील गुन्हयाव्यतिरीक्त २ मोटार सायकली, १ टी.व्ही, १ डी.व्ही.डी., २ स्पीकर, १ इले. मोटार जप्त करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक श्री. राजेश प्रधान व मा. अप्पर पोलीस अधिक्षक तुषार दोशी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. भास्कर थोरात, सपोनि सुजय घाटगे, पोना/कलीम पटेल, संजय भंडारे, राजेश गोसावी, बबलू नाईकवाडी, नारायण गोलेकर, रवि सुरवसे, इकबाल शेख, मपोकॉ मोहिनी भोगे यांनी बजावली आहे.

**( भास्कर थोरात )**
पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण